ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## शैक्षणिक सेवा विभाग

## गांधी विचारदर्शन पदविका शिक्षणक्रम (G10) : माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2020–2021**

# गांधी विचारदर्शन पदविका शिक्षणक्रम (G 10) : माहितीपुस्तिका

*अनुक्रमणिका*


**१. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय ........ ३**

**२. शिक्षणक्रमाविषयी ........ ३**

२.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

२.२ लक्ष्यगट

२.३ अध्ययन पद्धती

२.४ कालावधी

२.५ श्रेयांक

२.६ शिक्षणक्रम संरचना

**३. प्रवेश–प्रक्रिया ........ ५**

३.१ प्रवेश–पात्रता

३.२ शिक्षणक्रम शुल्क

**४. मूल्यमापन प्रक्रिया ........ ५**

**५. अभ्यासकेंद्रे ........ ७**

**६. विभागीय केंद्रे ........ ८**

**७. विशेष सूचना/संपर्कासाठी ........ ९**

# गांधी विचारदर्शन पदविका शिक्षणक्रम

## १. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय

शैक्षणिक सेवा विभाग (Academic Services Division) हा विद्यापीठातील एक महत्त्वाचा शैक्षणिक विभाग आहे. गरजाधारित शिक्षणक्रमांची आखणी, अंमलबजावणी तसेच उच्च दर्जाच्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती ही या विभागाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करणे व त्यासाठी दर्जेदार मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हे या विभागाने आपले ध्येय मानले आहे.

शैक्षणिक सेवा विभागाचे सर्व शिक्षणक्रम राज्यातील विविध अभ्यासकेंद्रांवर राबविले जातात. शैक्षणिक सेवा विभागातर्फे सदर अभ्यासकेंद्रांशी नियमित संपर्क राखला जातो आणि विद्यार्थ्यांनादेखील शैक्षणिक तसेच प्रशासकीय आधार पुरविला जातो.

सर्व शिक्षणक्रमांच्या विविध टप्प्यांवर गुणवत्ता निश्चितीसाठी सतत विशेष प्रयत्न केले जात असतात.

महाराष्ट्रात मुक्त विद्यापीठाची साधारणतः १०६ शिक्षणक्रमांची शिक्षणक्रमनिहाय १८०० अभ्यासकेंद्रे कार्यरत आहेत. या अभ्यासकेंद्रांचा विस्तारदेखील वेगाने होतो आहे व त्यासाठी प्रशिक्षित संमंत्रकांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाली आहे.

शिक्षणक्षेत्रात कार्यरत नसलेल्या अनेकांना शिक्षक म्हणून काम करण्याची आवड असते. अशा लोकांकडे पदव्युत्तर पदवी ही पात्रतादेखील असते. मात्र, शिक्षक म्हणून पूर्णवेळ सेवा देणे त्यांना शक्य होत नाही. असे अनेक लोक मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासकेंद्रांवर संमंत्रक म्हणून काम करू शकतात. अशा संभाव्य संमंत्रकांना शास्त्रोक्त पद्धतीने संमंत्रणाचे प्रशिक्षण देण्याच्या हेतूने शैक्षणिक सेवा विभागाने 'संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम' (Certificate Programme in Counsellor Training) विकसित केला आहे. हा शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्यांना व आवश्यक पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्यांना उपलब्धतेनुसार संमंत्रक होण्याची संधी मिळू शकते.

याबरोबरच शैक्षणिक सेवा विभागातून 'मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम' हा शिक्षणक्रमही राबविला जातो. तसेच 'गांधी विचार दर्शन पदविका' हा शिक्षणक्रमही शैक्षणिक सेवा विभाग राबवित आहे.

## २. शिक्षणक्रमाविषयी

### २.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

१. महात्मा गांधींच्या जीवनचरित्राच्या विविध पैलूंचा परिचय करून देणे.

२. महात्मा गांधींच्या विचारांचा परिचय करून देणे.

३. २१ व्या शतकातही महात्मा गांधींचे विचार कसे उपयुक्त व मार्गदर्शक आहेत याची वर्तमान संदर्भात चिकित्सा करणे.

४. विकसनशील देशांना भेडसावणाऱ्या समस्या जसे दारिद्र्य, बेरोजगारी, विषमता अशा विविध समस्यांवर मात करण्यासाठी, भारतीय अर्थव्यवस्थेशी सुसंगत ठरणाऱ्या गांधी विचारांवर आधारित अशा विकासनीतीविषयी वैचारिक मंथन घडवून आणणे.

५. गांधी विचारांच्या माध्यमातून नैतिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे महत्त्व समाजास पटवून देणे.

६. अहिंसा, सहकार, विश्वस्त वृत्ती, अपरिग्रह यांसारख्या गांधीजींनी मांडलेल्या विविध तत्त्वांची ओळख करून देणे, त्याचे महत्त्व पटवून देणे व व्यक्तिगत व सामाजिक जीवनात त्याचे आचरण करण्याविषयी धारणा निर्माण करणे.

**७. हा शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या प्रवेश पात्र विद्यार्थ्यास मुक्त विद्यापीठाच्या B.Ed. शिक्षणक्रमास प्रवेश घेताना तीन गुणांचा भारांक (प्रवेशात प्राधान्य) मिळेल.**

## २.२ लक्ष्यगट

**हा शिक्षणक्रम कोण करू शकेल?**

१. महात्मा गांधींचे विचार जाणून घेण्याची इच्छा असणारे जिज्ञासू नागरिक.
२. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते.
३. विविध सामाजिक संस्था व सेवाभावी संस्थांमध्ये काम करणारे कार्यकर्ते.
४. विविध सामाजिक उपक्रमात कार्य करू इच्छिणारे तरुण व कार्यकर्ते.
५. महाविद्यालयात शिकणारे युवक.
६. शाळा-महाविद्यालयांतील अध्यापक, व्याख्याते.

(प्रवेशपात्रतेसाठी कृपया मुद्दा क्र.३.१ पहा)

## २.३ अध्ययन पद्धती

१. नियुक्त पाठ्यपुस्तकांचे सूक्ष्म अध्ययन.
२. पुरवणी वाचनमालेसाठी नेमलेल्या पुस्तकांचे स्थूल अध्ययन.
३. अभ्यासकेंद्रावर समंत्रकांकडून अध्ययन-विषयांवर २० संपर्कसत्रांतून विवेचक मार्गदर्शन.
४. क्षेत्र-भेटी व प्रकल्प अहवालातून उपयोजित अध्ययन.
५. दोन पेपरची अंतिम लेखी परीक्षा व प्रकल्प अहवालातून मूल्यमापन.
६. विद्यार्थ्यांना अध्ययनसाहित्य म्हणून पुस्तके पुरविली जातील. मात्र पुरवणी वाचनासाठीची पुस्तके विद्यार्थ्यांनी स्वत: मिळवावयाची आहेत.

## २.४ कालावधी

शिक्षणक्रमाचा अध्ययन कालावधी एक वर्षाचा असेल. मात्र विद्यार्थ्यांची नोंदणी तीन वर्षांपर्यंत राहील. नंतर पुनर्नोंदणीची सुविधा नाही.

## २.५ श्रेयांक

हा शिक्षणक्रम १६ श्रेयांकांचा असून त्याचा कालावधी १ वर्षाचा आहे. ३० ते ३५ तासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, संदर्भसाहित्य संकलन व वापर इत्यादींचा समावेश आहे. एकूण ४८० ते ५०० तासांचा अभ्यास अभिप्रेत आहे.

## २.६ शिक्षणक्रम संरचना

### २.६.१ अंतिम लेखी परीक्षा

(i) या शिक्षणक्रमासाठी प्रत्येकी १०० गुणांच्या दोन पेपर्सची अंतिम लेखी परीक्षा द्यायची आहे. 'गांधी जीवनदर्शन' (OPN 073) व 'गांधी विचार' (OPN 074) ही दोन पेपर्सची शीर्षके आहेत.

(ii) 'गांधी जीवनदर्शन' (OPN 073) या पेपर अंतर्गत पुढील दोन पुस्तके अभ्यासावयाची आहेत. : (अ) गांधी जसे पाहिले, जाणिले विनोबांनी (ब) एकला चलो रे !

(iii) 'गांधी विचार' (OPN 074) या पेपर अंतर्गत पुढील दोन पुस्तके अभ्यासावयाची आहेत. : (अ) हिंद स्वराज्य, (ब) गांधी विचार

### २.६.२ प्रकल्प अहवाल (OPN 075)

या शिक्षणक्रमासाठी १०० गुणांसाठी प्रकल्प अहवाल विद्यार्थ्याने अभ्यासकेंद्र संयोजकाकडे सादर करायचा आहे.

गांधी विचारांवर आधारित दीर्घ निबंध किंवा गांधी विचाराधिष्ठित संस्था, उपक्रम आणि व्यक्ती यांच्या भेटीवर आधारित संशोधनात्मक अहवाल सादर करावा लागेल. किमान शब्दमर्यादा २०००. या प्रकल्प अहवालाचे मूल्यमापन अभ्यासकेंद्रावरील परीक्षक १०० गुणांसाठी करतील.

### २.६.३ अभ्यासक्रम

(१) गांधी जीवनदर्शन (०४ श्रेयांक) (OPN 073)
- (अ) गांधी जसे पाहिले, जाणिले विनोबांनी
  संपादक – कांतीभाई शाह
- (ब) एकला चलो रे
  लेखक – श्रीपाद केळकर
  संपादक – न्या. नरेंद्र चपळगावकर

(२) गांधी विचार (०४ श्रेयांक) (OPN 074)
- (अ) हिंद स्वराज्य – महात्मा गांधी
- (ब) गांधी विचार – प्रा. डॉ. मु. ब. शहा

**पुरवणी वाचन:**

याशिवाय पुढील पुस्तके पुरवणी वाचनासाठी राहतील.

- आत्मकथा – महात्मा गांधी
- सर्वोदय साधना–आ. दादा धर्माधिकारी
- शोध गांधींचा – न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

(३) प्रकल्प अहवाल (०८ श्रेयांक) (OPN 075)

गांधी विचारावर आधारित दीर्घ निबंध किंवा गांधी विचाराधिष्ठित संस्था, उपक्रम आणि व्यक्ती यांच्या भेटीवर आधारित संशोधनात्मक अहवाल सादर करावा लागेल.

### २.६.४ संपर्कसत्रे

या शिक्षणक्रमासाठी खालीलप्रमाणे संपर्कसत्रे होतील.

| | | |
|---|---|---|
| (१) गांधी जीवनदर्शन (OPN 073) | | |
| १.१ गांधी जसे पाहिले जाणिले विनोबांनी | : ०४ | ०९ |
| १.२ एकला चलो रे | : ०४ | |
| १.३ पुरवणी वाचन | : ०१ | |
| (२) गांधी विचार (OPN 074) | | |
| २.१ हिंद स्वराज्य | : ०४ | ०९ |
| २.२ गांधी विचार | : ०४ | |
| १.३ पुरवणी वाचन | : ०१ | |
| (३) प्रकल्प–अभ्यास (OPN 075) | : ०२ | ०२ |
| **एकूण** | | **: २०** |

### २.६.५ माध्यम

या शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी आहे. पुस्तके मराठी भाषेतून उपलब्ध असतील. अभ्यासक्रम मार्गदर्शन मराठी भाषेतून होईल. प्रश्नपत्रिका मराठी भाषेतून असेल. मात्र उत्तरे मराठी अथवा इंग्रजी भाषेतून लिहिता येतील.

# ३. प्रवेश–प्रक्रिया

## ३.१ प्रवेश–पात्रता

०१. किमान बारावी (HSC) परीक्षा उत्तीर्ण

**किंवा**

०२. य.च.म. मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण केलेली व्यक्ती या शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ शकते.

## ३.२ शिक्षणक्रम शुल्क

या शिक्षणक्रमाचे एकूण प्रवेश शुल्क रु.१९००/– (एक हजार नऊशे) आहे. त्यापैकी **विद्यापीठाचा हिस्सा रु.११००/– असून** तो प्रवेश अर्ज भरतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच **अभ्यासकेंद्र हिस्सा रु. ८००/– असून** अभ्यासकेंद्र हिश्श्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

**महत्त्वाचे :**
**विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरून झाल्यानंतर त्याचा प्रिंटआऊट घ्यावा. सदर प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करावा. अभ्यासकेंद्र हिस्सा (शुल्क) तसेच प्रवेश अर्जाचा प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यास या शिक्षणक्रमाचे उपलब्ध असलेले अध्ययन साहित्य (पुस्तके) प्राप्त होऊ शकेल.**

# ४. मूल्यमापन प्रक्रिया

प्रस्तुत शिक्षणक्रम ३०० गुणांचा असेल. गुणविभाजनाचा तपशील पुढीलप्रमाणे –

**०१. अंतर्गत मूल्यमापन**

प्रकल्प अहवाल : १०० गुण

**०२. अंतिम मूल्यमापन**

अंतिम मूल्यमापनात पाठ्यपुस्तकांवर आधारित पुढे दर्शविल्याप्रमाणे गुणविभाजन राहील.

| **क्र. १** | **गांधी जीवनदर्शन** | |
|---|---|---|
| (i) | गांधी जसे पाहिले, जाणले विनोबांनी | : ५० गुण |
| (ii) | एकला चलो रे | : ५० गुण |
| **क्र.२** | **गांधी विचार** | |
| (i) | हिंद स्वराज्य | : ५० गुण |
| (ii) | गांधी विचार | : ५० गुण |
| **एकूण** | | **३०० गुण** |

अंतिम परीक्षेसाठी १०० गुणांचे २ पेपर असतील. ३ तासांचा परीक्षा अवधी राहील. प्रकल्प अहवाल मार्गदर्शकाच्या स्वाक्षरीसह निर्देशित मुदतीत अभ्यासकेंद्रावर जमा करावा.

# ५. अभ्यासकेंद्रे

खाली दिलेल्या ठिकाणी 'गांधी विचार दर्शन पदविका' शिक्षणक्रमासाठी विद्यापीठाने अभ्यासकेंद्रे स्थापन केली आहेत. विद्यार्थ्याने त्यापैकी एक केंद्र निवडायचे आहे. केंद्रावर संपर्कसत्रे होतील. अभ्यासकेंद्राचा संकेतांक (Study Centre Code) त्या त्या केंद्रांच्या नावापुढे इंग्रजीमध्ये दिला आहे. तो प्रवेश अर्जावर लिहायला उपयोगी येईल. ही केंद्रे अशी –

| *क्र.* | *अभ्यासकेंद्रे केंद्र ठिकाण* | *अभ्यासकेंद्राचे नाव* | *संकेतांक* |
|---|---|---|---|
| १. | वाडेगाव (बाळापूर) | डॉ. नानासाहेब चिंचोलकर कनिष्ठ महाविद्यालय<br>वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला | 11100 |
| २. | अमरावती | कॉलेज ऑफ सोशल वर्क, युनिव्हर्सिटी रोड, कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२ | 12131 |
| ३. | दुसरबीड (बुलढाणा) | नारायणराव नागरे कला व वाणिज्य महाविद्यालय, मु.पो. दुसरबीड<br>ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा | 1352A |
| ४. | खामगाव | कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, दूरदर्शन केंद्राजवळ, वामन नगर, मु.पो. खामगाव<br>जि. बुलढाणा–४४४ ३०३ | 1392A |
| ५. | खामगाव | स्व.गजानन माणिकरावजी गावंडे विज्ञान महाविद्यालय, स.नं. १२७, ए.एन.एस. इन्फोव्हॅली कॅम्पस, चांदमारी चौक, शेलोडी रोड, मु. पो. ता. खामगाव, जि. बुलढाणा | 13109 |
| ६. | यवतमाळ | त्यागी सेवामंडळाचे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन<br>गांधी नगर, चर्चजवळ, यवतमाळ– ४४५ ००१ | 1473A |
| ७. | औरंगाबाद | एस.बी. कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगपुरा, सरस्वतीनगर<br>औरंगाबाद – ४३१ ००१ | 2103A |
| ८. | औरंगाबाद | मातोश्री डॉ. कांचन शांतीलालजी देसरडा इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, डी.के.एम.एम. मेडिकल कॉलेज कॅम्पस, गुरू गणेश नगर, पहाडसिंगपुरा, औरंगाबाद | 21187 |
| ९. | अंबाजोगाई | स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड – ४३१ ५१७ | 2201A |
| १०. | जालना | अभिनव कॉलेज ऑफ आय.टी. अँड मॅनेजमेंट, २५, छत्रपती कॉलनी, तहसीलदार कार्यालयाजवळ, जुना जालना, जि. जालना – ४३१ २१३ | 2351A |
| ११. | घनसांगवी | मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय<br>कुंभार पिंपळगाव, ता. घनसांगवी, जि. जालना | 2354A |
| १२. | गणेशपूर (भंडारा) | श्री संत गुलाबबाबा शिक्षणसंस्था<br>घर नं. ८१९, आंबेडकर वॉर्ड, गणेशपूर, ता. जि. भंडारा – ४४१ ९०४ | 4157A |
| १३. | गडचिरोली | शिवाजी महाविद्यालय, धानोरा रोड, गडचिरोली | 4301A |
| १४. | नागपूर | महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, ३४९/२, कस्तुरबा भवन, बजाज नगर<br>नागपूर – ४४० ०१० | 44337 |
| १५. | अर्जुनी मोर | जय दुर्गा हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज<br>गौर नगर, ता. अर्जुनी मोर, जि. गोंदिया – ४४१ ७०१ | 4631A |
| १६. | गोंदिया | श्री संत ज्ञानेश्वर विद्यालय<br>आडासी रोड, दातोरा, जि. गोंदिया | 4634A |

| क्र. | अभ्यासकेंद्रे केंद्र ठिकाण | अभ्यासकेंद्राचे नाव | संकेतांक |
|---|---|---|---|
| १७. | नाशिक | ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, पहिला मजला इंदिरा गांधी संकुल, उडिपी स्पाईसमागे, महात्मा नगर, नाशिक | 54282 |
| १८. | सिन्नर (नाशिक) | मराठा विद्या प्रसारक समाजाचे जी. एम.डी. आर्टस, बी. डब्ल्यू कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, सिन्नर, जि. नाशिक – ४२२ १०३ | 54433 |
| १९. | सांगली | शांतिनिकेतन महाविद्यालय, सांगली – ४१६ ३०९ | 7202A |
| २०. | सावंतवाडी | श्री. पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग – ४१६ ५१० | 7451A |
| २१. | चापोली (लातूर) | संजीवनी महाविद्यालय, मु.पो. चापोली, ता. चाकूर, जि. लातूर – ४१३ ५१३ | 8491A |
| २२. | अहमदपूर (लातूर) | डॉ. एस. एस. एस. प्रतिष्ठानचे अध्यापक महाविद्यालय, मु.पो. ता. अहमदपूर, जि. लातूर | 84103 |
| २३. | परभणी | कै. सौ. कमलाताई जामकर महिला महाविद्यालय, जिंतूररोड, पो.बॉ. नं.३४ परभणी – ४३१ ४०१ | 8710A |
| २४. | गंगाखेड (परभणी) | कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी – ४३१ ५१४ | 87103 |
| २५. | हिंगोली | शिवाजी कॉलेज, कोठलज रोड, हिंगोली – ४३१ ५१३ | 8804A |
| २६. | हिंगोली | रेनबो कॉम्प्युटर्स, शिवाजी नगर, हिंगोली – ४३१ ५१३ | 8801A |

## ६. विभागीय केंद्रे

(१) **अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र, व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही., अमरावती – ४४४ ६०४
☎ : (०७२१) २५३१४४५, फॅक्स : २५३१४४४, मोबाईल : ९४२२२४७२९२, **(कार्यक्षेत्र : अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ)**

(२) **औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र, द्वारा : सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस, नंदनवन कॉलनी, छावणी, औरंगाबाद – ४३१ ००२
☎ : (०२४०) २३७१०६६, फॅक्स : २३७१०८८, मोबाईल : ९४२२२४७२९३, **(कार्यक्षेत्र : औरंगाबाद, जालना, बीड)**

(३) **मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र, द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ) नाना चौक, ग्रँट रोड (प.), मुंबई – ४०० ००७
☎ : (०२२) २३८७४१८६, फॅक्स : २३८१३२५६ मो. : ९९६९०१३८८६, **(कार्यक्षेत्र : मुंबई, रायगड)**

(४) **नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र, सुभेदार हॉल, विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅम्पस, रविनगर चौक, नागपूर – ४४० ००१
☎ : (०७१२) २५५३७२४, फॅक्स : २५५३७२५ मो. : ९४२२२४७२९५, **(कार्यक्षेत्र : नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली,चंद्रपूर)**

(५) **नाशिक :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र, नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी, नाशिक – २
☎ : (०२५३) २३१७०६३, फॅक्स : २५७५६५६ मो. : ९४२२२४७२९७, **(कार्यक्षेत्र : नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर)**

(६) **पुणे :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र, शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग, पुणे –४११ ०३०
☎ : (०२०) २४४९११०७, फॅक्स : २४४५७९१४, मोबाईल : ९४२२२४७२९८, **(कार्यक्षेत्र : पुणे, सातारा)**

(७) **कोल्हापूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र, शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफिसजवळ, विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४
☎ : (०२३१) २६०७०२२, फॅक्स : २६०७०२२, मोबाईल : ९४२२२४७२९४, **(कार्यक्षेत्र : कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग)**

(८) **नांदेड :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र, द्वारा : स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, क्रीडा इमारत, नांदेड – ४२१ ६०६
☎ : (०२४६२) २३६७१८, फॅक्स : २३६७१८, मोबाईल : ९४२२२४७२९६, **(कार्यक्षेत्र : नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली)**

## ७. विशेष सूचना/संपर्कासाठी

(१) विद्यापीठाचे सध्याचे वा वेळोवेळी बदलणारे परिनियम, अधिनियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक असतील.

(२) शैक्षणिक सेवा विभागाने दिलेले निर्देश, सूचना विद्यार्थ्यांवर बंधनकारक असतील.

(३) आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर पुरेशी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर वर्ग (Transfer) करण्यात येईल.

(४) अंतिम प्रवेश निश्चितीसाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर स्वत: चौकशी करावयाची आहे. प्रवेश निश्चित झाल्याशिवाय परीक्षा देता येणार नाही.

(५) विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास त्यास प्रवेश शुल्क परत मिळणार नाही.

(६) प्रवेशपात्रता नसताना एखाद्या विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज व शुल्क भरल्यास त्यास सर्वस्वी तो विद्यार्थी जबाबदार असेल. अशा विद्यार्थ्यास प्रवेशशुल्क परत दिले जाणार नाही.

■ **शैक्षणिक बाबींविषयी**

**प्रा. डॉ. प्रमोद बियाणी**
संचालक, शैक्षणिक सेवा विभाग
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३ – २२३००१० व २२३००४७

■ **निकालविषयक चौकशी**

उपकुलसचिव
परीक्षा विभाग, युनिट एक
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३ – २२३०७१६

■ **कार्यालयीन पत्रव्यवहाराचा पत्ता**

**शैक्षणिक सेवा विभाग**
**(Academic Services Division)**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२
दूरध्वनी : ०२५३ – २२३००१०
०२५३ – २२३००४७
E-mail: ycmou.asd@gmail.com

■■■

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १।।
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*


**निर्मिती**

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२



© २०२०, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



- **प्रकाशन** : जून २०२०
- **अक्षरजुळणी** : ओम कॉम्प्युटर्स, नाशिक - ४२२ ००७
- **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

NB20-21-08